## निशाणी क्र.३ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी जाबदार यांचेकडून कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे तरतुदीप्रमाणे अंतरिम पोटगी, पोलीस सरंक्षण व राहणेस दोन खोल्या मिळणेबाबत व मुलांना भेटण्यास जाबदारने हरकत करु नये या मागणीसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदार यांचे कथनानुसार अर्जदार हिचे लग्न जाबदार नं.१ याचेबरोबर दि. २६/६/२००१ रोजी भेडसगाव, तह.शाहुवाडी, जि. कोल्हापूर येथे झालेला असून लग्नानंतर अर्जदार ही जाबदार यांचेकडे नांदायला गेली असता, पहिली पाच वर्षे जाबदार यांनी अर्जदार हिला चांगल्याप्रकारे सांभाळुन घेतले. दरम्यानचे काळात अर्जदार हीस जाबदार क्र.१ पासून विनायक व स्नेहल अशी मुले झाली आहेत. अर्जदार हीस स्नेहल ही मुलगी झालेनंतर जाबदार क्र.१ हा मुलगी झाली म्हणून अर्जदारवर नाराज होता व मुलगा पाहिजे म्हणून या ना त्या कारणांवरुन अर्जदारशी भांडणतंटा करुन तिला वेळचेवेळी जेवण न देणे, घरातील कामे करुन घेणे, चारित्रयावर संशय घेणे असे करीत व चारित्रयाचे संशयावरुन अर्जदारला हातपाय बांधुन लाथाबुक्यांनी व दांडक्याने मारहाण केलेली आहे. त्याचबरोबर शिवीगाळ करुन शारिरीक व मानसिक छळ केलेला आहे. मात्र, अर्जदारचे माहेरची परिस्थिती गरिबीची असलेने व तिला दोन मुले असल्याने अर्जदार भविष्यात संसार सुखाचा होईल म्हणून जाबदार यांचा सर्व त्रास मारहाण सहन करीत होती. मात्र, जाबदार यांनी अर्जदार हिला समजुन घेतले नाही व जाबदार नं.१ हा जाबदार नं.२ ते ५ यांचे सांगणेवरुन अर्जदार हिला शिवीगाळ, मारहाण करीत असे तसेच तिचे चारित्रयावर संशय घेत असे. अर्जदारने तिचे वडिलांमार्फत व मध्यस्थांमार्फत जाबदारला समजावून सांगणेचा प्रयत्न केला असता, जाबदारने ते ऐकले नाही व अर्जदार हिला मारहाण शिवीगाळ करुन दि.२४/४/२०१३ रोजी तिचे माहेरी आणुन सोडले व त्यानंतर अर्जदारचे वडिलांनी व मध्यस्थांनी वारंवार प्रयत्न करुनही जाबदारने अर्जदारला नांदवणेस नकार दिला व अर्जदारला नांदायला पाठविले तर जिवंत ठेवणार नाही असे म्हणून धमकावले. त्याचबरोबर मुलांना भेटायचे नाही अशीही ताकिद दिली. अर्जदार हिने जाबदारला नांदायला नेणेसाठी वकिलांमार्फत नोटीस पाठिविली असता, जाबदार नं.१ ने अर्जदार हिचे चारित्रयावर घाणेरडे आरोप करुन वकिलांमार्फत नोटीसीला खोटे उत्तर दिले. त्यानंतर अर्जदारने जाबदारविरुध्दचा अर्ज दाखल केला, मात्र त्यामध्ये अनावधानाने कांही गोष्टी नमूद करावयाच्या राहुन गेल्या, त्यामुळे जाबदार नं.१ यांनी अर्जदारचे चारित्रयावर खोटया कथनांचे व घटनांचे शितोंडे उडविलेले आहेत व खोटा व बनावट कागद हजर केलेला आहे. जाबदार नं.१ यांनी डिसेंबर २०१५ मध्ये जाबदार नं.२ शी बेकायदेशीर विवाह केलेला असून जाबदार क्र.२ ही पत्नी म्हणून जाबदार क्र.१ कडे नांदत आहे. अर्जदार हिचे माहेरची परिस्थिती अत्यंत गरिबीची असून अर्जदार ही स्वत:चा चरितार्थ स्वत: चालविणेस असमर्थ आहे व जाबदार नं.१ याने कोणत्याही संयुक्तिक कारणाशिवाय

अर्जदारचा त्याग केलेला आहे व तिचे पोटापाण्याची काहीही व्यवस्था केलेली नाही अगर कौटुंबिक जबाबदारी स्विकारलेली नाही. तसेच जाबदार हे अर्जदार हिला मुलांना भेटूही देत नाही.

३. अर्जदारचे पुढे असेही कथन आहे की, जाबदार हे डी.वाय.पाटील सह. साखर कारखाना लि. पळसंबे, ता. गगणबावडा जि. कोल्हापूर येथे रसायन उत्पादन विभागामध्ये सुपर वायझर म्हणून कार्यरत असून त्यास दरमहा ३०,०००/- रुपये पगार मिळतो. तसेच जाबदार ट्रॅक्टर ट्रॉली वगैरे शेती औजारे भाडयाने देवून उत्पन्न मिळवतो. जाबदार यांनी भेडसगाव यांनी ९ खोल्याचे आर.सी.सी. इमारतीचे बांधकाम केलेले असून त्यांना १० एकर उस पिकाची जमिन आहे व त्यातुन त्यांना दरसाल ८ ते १० लाख रुपये उत्पन्न मिळते. त्याचबरोबर, जाबदार यास दुभत्या गाई म्हशींपासून दररोज ५०० ते ६०० रुपये उत्पन्न मिळते. जाबदार हे एकत्र कुटुंबात राहत असून जाबदार क्र.१ चे सर्व भाउ नोकरीस असून त्यांना साधारण १५ ते २० हजार रुपये पगार मिळतो. त्यामुळे अर्जदार हिने जाबदारकडून अंतरिम पोटगी म्हणून दरमहा रक्कम रुपये ७०००/- व जाबदारचे राहते घरातील दोन खोल्या अर्जदारला राहणेस मिळणेबाबत, त्याचबरोबर अर्जदारला गरज भासल्यास कौटुंबिक हिंसाचारापासून पोलीस संरक्षण मिळणेबाबत व मुलांना भेटण्यास जाबदार याने हरकत करु नये अशी विनंती अर्जदार यांनी केलेली आहे.

४. जाबदार यांना संधी देवूनही त्यांनी अर्जदारतर्फे दाखल सदरचे हंगामी पोटगी अर्जास म्हणणे दाखल केलेले नाही. जाबदार यांनी सदर प्रकरणामध्ये मूळ अर्जास म्हणणे दाखल केलेले आहे व मूळ अर्जातील संपूर्ण मजकूर नाकारलेला आहे. जाबदार याने त्याचे मुळ अर्जाचे म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, अर्जदार हिचे त्यांचे गावातील व्यक्तीबरोबर अनैतिक संबंध होते व त्यामुळे अर्जदार ही विवाहबाहय व्यभिचारी कृत्य करीत होती असे नमूद केलेले आहे. त्याचबरोबर अर्जदार हिचे व्यभिचारी कृत्याची माहिती मिळाल्यानंतर अर्जदारचे भावाने अर्जदार व सदर इसम आनंदा केशव पाटील यांना लाथाबुक्यांनी मारहाण केल्याचे व घराण्याची अब्रु जावू नये म्हणून व राजकीय दडपणापोटी पोलीस केस केली नाही व त्यावेळी अर्जदार व तिचे सोबतचा इसम नामे आनंदा केशव पाटील यांनी सर्वांची माफी मागून पुन्हा असे करणार नाही असे म्हणून चांगले वर्तवणुकचा स्टॅम्प सर्वांसमोर लिहून देण्याचे ठरले व त्याप्रमाणे अर्जदार हिने जाबदार यांना चांगल्या वर्तवणुकीचा स्टॅम्प लिहून दिला, मात्र त्यानंतर जाबदार यांनी अर्जदार हिला नांदायला आणल्यानंतर दुसरे दिवशी पुन्हा अर्जदार ही सदर इसम केशव पाटील याचे गाडीतुन निघून गेली. त्यानंतर अर्जदारचे हिचे आई, वडिल, भाउ व जावई यांनी आनंदा केशव पाटील यांना बोलावुन घेवून अनैतिक संबंध थांबविणेबाबत सांगितले असता, त्याने अर्जदार हिला आयुष्यभर सांभाळतो, असे सांगितले. जाबदार यांचे मुळ अर्जास पुढे असेही म्हणणे आहे की, आनंदा केशव पाटील याचा भाउ विश्वासराव नाईक सहकारी साखर कारखान्यात संचालक असलेने जाबदार नं. १ यास त्या कारखान्यातील नोकरीचा राजकीय दबावापोटी राजीनामा दयावा लागला व रोजंदारीवर काम

करणेची पाळी आली आहे. जाबदार नं.१ यास त्याचे मुलांचे शैक्षणिक खर्चापोटी वार्षिक ८००००/- रुपये व मुलीचे दवाखान्यापोटी दरमहा २५००/- इतका खर्च होतो व तो लोकांकडून उसणे व कर्जाऊ पैसे घेवून सदर खर्च भागवित आहे. जाबदार यांना उत्पन्नाचे साधन नाही व अर्जदार हीने व्याभिचारी व अनैतिक विवाहबाहय संबंतातुन जाबदार याचा त्याग केलेला असल्याने तिला कायदयाने पोटगी मागणेचा अधिकार नाही व तिला कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई, निवारा, पोलीस संरक्षण मागता येणार नाही. त्यामुळे जाबदार याने मुळ पोटगी अर्ज नामंजूर करणेची विनंती केलेली आहे.

५. प्रस्तुत कामी वर नमूद केलेप्रमाणे जाबदार याने जरी अर्जदारने दाखल केलेल्या कौंटुबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियमाचे कलम १७ ते २२ अन्वये दाखल केलेल्या मुळ अर्जास म्हणणे दाखल केले असले तरी सदरचे हंगामी / दरम्यानचे पोटगी अर्जास (नि.क्र.३) जाबदार नं.१ याने म्हणणे दाखल करुन सदर अर्जातील मजकूर स्पष्टपणे नाकारलेला नाही.

६. प्रस्तुत कामी, अर्जदार व जाबदार नं.१ हे पती पत्नी असलेबाबत व त्यांना एक मुलगा व एक मुलगी असलेबाबत व ती दोन्ही मुले जाबदार यांचेकडे असलेबाबत अर्जदार व जाबदार यांचेमध्ये वाद नाही. त्याचबरोबर अर्जदार ही तिचे माहेरी राहत असलेबाबत जाबदारने नाकारलेले नाही. तसेच, अर्जदार ही कामधंदा करुन स्वत:चे उपजिविका करते व तिला उत्पन्नाचे साधन आहे, याबाबतही जाबदारने स्पष्टपणे कथन केलेले नाही. जाबदारचा मुख्य बचाव हा अर्जदार ही व्यभिचारी जीवन जगत होती व तिचे आनंदा केशव पाटील नामक व्यक्तीशी विवाहबाहय संबंध आहेत व त्यामुळे ती जाबदारकडून पोटगी अथवा अन्य कसलीही दाद मिळणेस पात्र नाही असा आहे. त्याचबरोबर जाबदार यास उत्पन्नाचे साधन नाही व त्यामुळे तो अर्जदार हिचे मागणीप्रमाणे पोटगी देवू शकत नाही असाही जाबदार याचा त्याचे मुळ अर्जाचे म्हणण्यामध्ये बचाव आहे. जाबदार याने मूळ अर्जास म्हणणे दि.२३/३/२०१६ रोजी दाखल केलेले आहे. अर्जदार हिने प्रस्तुत अर्जाचे पुष्ठयर्थ निशाणी क्र.१७ अन्वये शपथपत्र दाखल केलेले असून अर्जातील मजकूर शपथेवर कथन केलेला आहे.

७. अर्जदारने जाबदार नं.१ यास नोकरीतुन दरमहा ३०,०००/- रुपये पगार मिळतो, त्याचबरोबर जाबदार यांना १० एकर उस पिकाची जमिन असून त्यातून दरसाल ८ ते १० लाख रुपये उत्पन्न मिळते व दुभत्या जनावरांपासून दररोज ५०० ते ६०० रुपये उत्पन्न मिळते व त्यामुळे तो अर्जदार यांना अंतरिम पोटगी देण्यास समर्थ आहे असे कथन केलेले आहे. जाबदारचे उत्पन्नाबाबत अर्जदार यांनी डॉ. डी.वाय. पाटील सह. साखर कारखाना यांचेकडील जाबदार क्र.१ याचे माहे जानेवारी २०१६ ते जून २०१६ चे पगारपत्रकाचा उतारा हजर केलेला असून माहे जानेवारी २०१६ मध्ये जाबदार यास रक्कम रुपये २२,५५५/- एवढा पगार व त्यातून वजावट होवून रक्कम रु.११,६४९/-, फेब्रुवारी २०१६ मध्ये

वजावट जाता रु.१२,७६७/-, मार्च २०१६ मध्ये वजावट जाता रु.११०६०/- एप्रिल २०१६ मध्ये वजावट जाता ८३६७/- मे २०१६ मध्ये वजावट जाता ८३६७/- व जून २०१६ मध्ये वजावट जाता रक्कम रु.८३५५/- इतकी रक्कम पगार म्हणून रोख हाती मिळाल्याचे दिसून येते. जरी जाबदार नं.१ ने त्यास नोकरीचा राजीनामा दयावा लागल्याचे कथन केले असले तरी सदर पगारपत्रकावरुन ती बाब स्पष्ट होत नाही. जाबदार यास शेतातुन व पाळीव जनावरांपासून त्याचबरोबर शेती औजारातुन उत्पन्न मिळते या अर्जदारचे कथनाबाबत अभिलेखावर कसलाही पुरावा नाही. जाबदार यास शेती असलेबाबत व त्यातुन त्याला उत्पन्न मिळत असलेबाबत अर्जदारने सदर शेत जमिनीचे उतारे अभिलेखावर दाखल केलेले नाहीत. त्यामुळे जाबदार यास शेत जमिनीतुन व पाळीव प्राण्यांपासून तसेच घर मिळकतीतून उत्पन्न मिळते, ही बाब सदय:स्थितीत सिध्द होत नाही. मात्र, जाबदार यास उत्पन्नाचे साधन नाही या जाबदार यांचे मूळ अर्जात घेतलेल्या बचावास पुष्टी मिळत नाही.

८. जाबदार क्र.१ याचेवर त्याचे व अर्जदार यांचे दोन मुलांची जबाबदारी आहे, ही बाब वादग्रस्त नाही. त्याचबरोबर जाबदार नं.१ यास शारिरीक व्याधी आहे व तो शारिरीकदृष्टया श्रमाची कामे करु शकत नाही असाही जाबदार क्र.१ चा बचाव नाही. त्याचबरोबर अर्जदार ही जाबदार नं.१ याची पत्नी असून तिचे पालनपोषणाची संपूर्ण जबाबदारी पती या नात्याने जाबदार क्र.१ याचेवर आहे. जाबदार याने नि.क्र.१० चे कागदपत्र यादीसोबत एका करारपत्राची झेरॉक्स प्रत, उत्तरी नोटीसीची झेरॉक्स प्रत इ. कागदपत्रे दाखल केलेली आहेत. जाबदार याने अर्जदार हिचे विरुध्द केलेले विवाहबाहय संबंधाबाबतचे आरोप सदर प्रकरणांमध्ये पुराव्याअंती सिध्द होणे आवश्यक आहे व त्याबाबत प्रकरणामध्ये चौकशी वेळी साक्षी पुरावा होणार आहे, मात्र सदर प्रकरणाचे दरम्यानचे काळामध्ये अर्जदार हिचे उपजिविकेसाठी जाबदार नं.१ याने पती या नात्याने तिला अंतरिम पोटगी देणे आवश्यक वाटते.

९. सबब, अर्जदार व जाबदार नं.१ यांचे उत्पन्नांचा, त्याचे गरजांचा, जाबदार क्र.१ वरील अवलंबीत मुले, आई वडिल यांचा, त्यांचे दैनंदिन गरजांचा व जिवनावश्यक वस्तुंच्या किमंतीचा विचार करुन जाबदार नं.१ याने अर्जदार हिला हंगामी / अंतरिम पोटगी म्हणून सदर हंगामी पोटगी अर्ज दाखल तारखेपासून दरमहा रु.१०००/- पोटगी देणे योग्य होईल असे वाटते. त्याचबरोबर जाबदार याने अर्जदार हीस तिचे मुलांना म्हणजेच चि. विनायक व स्नेहल यांना भेटावयाचे असल्यास तिला हरकत अडथळा करु नये व अर्जदार हिला आवश्यकता भासलेस कौंटुबिक हिंसाचाराविरुध्द पोलीस मदत मिळणेबाबत आदेश करणे योग्य होईल असे वाटते. अर्जदार हिने जाबदार यास राहते घर असलेबाबत जरी अर्जात नमूद केले असले तरी त्याबाबतचा कसलाही पुरावा अगर घराचा उतारा अभिलेखावर दाखल केलेला नाही. त्याचबरोबर अर्जदार ही तिचे माहेरी राहत आहे व जाबदार यास ९ खोल्यांचे घर आहे व त्यातील दोन खोल्या अर्जदार हीस राहणेस मिळाव्यात या अर्जदारचे मागणीबाबत पुरावा अभिलेखावर नाही.

त्यामुळे सदयस्थितीत त्याबाबत आदेश करणे योग्य होणार नाही. सबब, वरील नमूद सर्व कारणांचा विचार करुन, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे:-

## आदेश

१. अर्ज अंशत: मंजूर करणेत येतो.

२. जाबदार क्र.१ यांनी सदर अर्ज दाखल तारखेपासून मुळ अर्जाचे अंतिम निकालापावेतो अर्जदार यांना दरमहा प्रत्येकी १०००/- रुपये प्रमाणे अंतरिम पोटगी द्यावी.

३. त्याचबरोबर जाबदार यांनी अर्जदार हीस तिचे मुलांना भेटण्यास हरकत करु नये.

४. जाबदार यांनी अर्जदार हीस शारिरीक अथवा मानसिक त्रास दिल्यास अर्जदार यांनी त्यांच्या परिसरातील पोलीस ठाणेतुन सरंक्षण घ्यावे.

५. सदर आदेशाची प्रत अर्जदार व जाबदार यांना विनामुल्य देण्यात यावी. तसेच, या आदेशाची एक प्रत अर्जदार राहत असलेल्या क्षेत्रातील पोलीस ठाण्यास व संरक्षण अधिकारी यांना पाठविण्यात यावी.

स्वाक्षरी/-
(वि.आ.अवघडे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पन्हाळा.

पन्हाळा.
तारीख:-०२/११/२०१७.

## प्रमाणपत्र

असे प्रमाणित करणेत येते की, पी.डी.एफ. निकालपत्र/आदेश यामधील सर्व मजकूर मूळ निकालपत्रातील मजकूराप्रमाणे तंतोतंत खरा व बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नांव | श्री. अ. आ. पाटील |
| न्यायालयाचे नांव | श्री.वि.आ.अवघडे |
| श्रुतलेखन दिल्याचा दिनांक | ०२/११/२०१७ |
| न्यायिक अधिका-यांनी निकालपत्रावर स्वाक्षरी केलेचा दिनांक | ०२/११/२०१७ |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | ०२/११/२०१७ |